ISSN 2279- 0632

# GLOBAL DREAMS

International Research Journal Registered & Recognized Higher Education For All Subjects & All Languages

Editor In Chief

**Arun B. Godam**

Dec-16-②

ISSN 2279-0632

MAHMUL03034

# Global Dreams

International Registered & Recognized Higher Education For All Subjects & All Languages

Editor In Chief
Arun B. Godam

Vol I Issue VII ( Half Yearly) Aug. 2015 To Jan 2016

Editorial Office :
Khadgaon Road, Kapil Nagar, Latur, Dist. Latur 413512 (M.S.) India.

Contact :- Arun B. Godam
8149668999, 8483959442
E-mail :
hitechresearch11@gmail.com.

EXECUTIVE EDITORS

Dr. Bharat Handibag
Dean, Fcuity of Arts.
Dr.B.A.M.University
Aurangabd (M.S.)

Dr. U.T. Gaikwad
Dept. of Geography,
Smt. S.D.M. College
Latur, Dist. Latur (M.S.)

Pro. S.B. Karande
Dept. of Economics,
Shri Bhausaheb Vartak College,
Borivali (W), Dist. Mumbai.

Dr. N.J. Waghmare
Research Guide & Head,
Dept. of Pali,
Govt. Sanatketar College,
Shivari, (M.P.)

Prof. Abdul Majeed
Dept of Mekanical Engg.
Shreyash Polytechnich,
Aurangabad. Dist. Aurangabad

Dr Kailash Thombre
Dept of Economics
Deogiri College,
Aurangabad, Dist. Aurangabad

DEPUTY-EDITORS

B.J. Hirve
Dept. of botany
Vasant Mahavidyalaya.
Kaij. Dist. Beed. (M.S.)

Durdana Siddiqui
Head, Dept of Economics,
Sir Sayyed College,
Aurangabad, Dist. Aurangabad

S.M. Bansode
Dept. of Sociology,
Shri Shiv Shahu Mahavidalaya,
Sarud. Tq. Shahuwadi. Dist. Kolhapur

S. R. Uchale
Librarian,
Shri Bhausaheb Vartak College,
Borivali (W), Mumbai

Shaurya Publication,
Latur

Price : Rs. 225/-

www.rjournals.com

| | | | |
|---|---|---|---|
| 13 | In The Union Of State Of India. | Gaikwad Rajesh Kachru | 72-76 |
| 14 | मोहनदास नैमिशराय के उपन्यासों मे विद्रोह | डॉ. नागणे विजय भास्कर | 77-80 |
| 15 | श्रीनिवास रामानुज की गणितीय कार्यशैली और उपलब्धियों का इतिहास | प्रा. चव्हाण मारोती पोमा | 81-84 |
| 16 | भ्रूणहत्या ओंका बढता प्रचलन समस्याओंका एक तात्विक अध्ययन : | प्रा. बजाज डी.पी. | 85-89 |
| 17 | भारतातील शेतमाल किंमतविषयक धोरण एक अभ्यास | कदम कुलदीप शंकरराव | 90-93 |
| 18 | महात्मा बसवेश्वर आणि समता संकल्पना : एक पुनर्मूल्यांकन | प्रा.डॉ.रत्नाकर बाबुराव लक्षटे | 94-104 |
| 19 | चरित्र संकल्पना आणि स्वरुप | डॉ.संजीवकुमार व्ही. पांचाळ | 105-106 |

ISSN 2279-0632
GLOBAL DREAMS
Half yearly Research Journal Vol I Issue VII, Aug 2015 to Jan 2016


# महात्मा बसवेश्वर आणि समता संकल्पना : एक पुनर्मूल्यांकन

प्रा.डॉ.रत्नाकर बाबुराव लक्षटे
पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
देगलूर महाविद्यालय देगलूर

18 Research Paper - Political Sci.

१२ व्या शतकाच्या सुरुवातीस दक्षिण भारतामध्ये बसवेश्वर मादरस नावाच्या महात्म्याचा जन्म झाला. त्याकाळात भारतामध्ये मनुस्मृतीप्रणीत वैदीक समाजव्यवस्था उदयास आली. ती व्यवस्था आपल्याला मान्य असो कि नसो, ती योग्य असो की नसो पण व्यापक चर्चाविश्वाचा भाग म्हणून ती आपल्याला अपरिहार्यपणे स्वीकारावी लागते. कारण ती बसव युगाची व्यवस्था होती. या व्यवस्थेची आपण प्रतारणा केली तर बसव तत्वाच्या चर्चाविश्वामध्ये आपणच अप्रस्तुत होण्याची शक्यता असते. महात्मा बसवेश्वरांसारख्या दिव्य वलयी व्यक्तिमत्वाचा आणि त्यांच्या गतिमान विचारांचा वेध घेताना समकालीन युगाच्या व्यवस्थेचा आवाज ऐकावाच लागेल.

बसवेश्वरांच्या काळात विचारसरणचे युग संपले होते. परिवर्तनवादी चळवळींना ओहोटी लागली होती. पुरोगामी विचारावर आधारीत राजकारण व संघटना अप्रस्तुत होत्या. दक्षिण भारत नव्हे तर संपूर्ण जग दैववाद व धर्मशास्त्राच्या अंध:कारमय खाईत लोटले गेले. संपूर्ण मानव जातीच्या जगण्याचे व जीवनशैलीचे संदर्भ धर्माधिष्ठित होते. परिवर्तनाचे सर्व सिध्दांत, तत्वचर्चा कालबाह्य झाली होती. तत्काळात संस्कृती हे संघर्षाचे, वाद प्रतिवादाचे प्रधान क्षेत्र होते. बसव काळातील राजकारण, धर्म, वर्ग, वर्णहित, सामाजिक अन्यायासाठी साधनसामुग्रीचे केंद्रीकरण करण्याच्या तत्वावर आधारित होते. त्याआधारेच राजकारण चालले होते. मानव जातीला अस्तास नेणाऱ्या परिस्थितीत सुधारणा करण्या विषयीची चर्चा बसवेश्वरांनी वचनातून केली.

बसवेश्वरांच्या समता तत्वाचा विचार करताना त्यांच्या वचन साहित्याला ध्यानात घ्यावे लागेल. परिवर्तनवादी युगाची नांदी ठरणाऱ्या विचारांची नोंद घ्यावीच लागेल. ती घेत असताना बसवेश्वरांनी भाषेचा वापर कोणत्या प्रयोजनाने केला हे ही विसरुन चालणार नाही. भाषा ही एका बाजूला तथ्य वर्णन करीत वास्तवाचे दर्शन घडवून देते तर दूसऱ्या बाजूला ती कांही संदेश देवून आपले दृष्टीकोण, जाणिवा आणि मानसिकतेची

GLOBAL DREAMS
Half yearly Research Journal Vol I Issue VII, Aug 2015 to Jan 2016
ISSN 2279-0632

...णा करीत आपले वर्चस्वही गाजवत असते. बसवकाळातील संस्कृत भाषेनेही समाजमनावर आपले ... वर्चस्व निर्माण केले होते. त्या भाषेतून समाजाचे होणारे तथ्यनिर्देशक नकळत बहुजनांच्या जीवननिष्ठा ... संस्कृतच्या साह्याने लिहिलेल्या वैदीक ग्रंथानाच बहुजनांनी आपले विचार म्हणून स्विकारले. तीच ...जीवनधारणा बनली होती. परिणामतः बसवेश्वरांनी संस्कृत या वैदीक भाषेऐवजी कन्नड या प्रादेशिक व ...ज्यांना समजणाऱ्या भाषेतून प्रस्थापीत समाजातील वर्णसंघर्ष व समतेची भाषा मांडली. तत्काळात एका ...विषमतेचे विदारक दर्शन होत असताना आणि शुद्र, अस्पृश्य, वंचित यांच्या अस्तित्वासाठीचा लढा चालू ...ना सामाजिक न्याय, समता ही ध्येये नजरेआड होवू लागली. पण बसवेश्वरांनी त्या संदर्भात मूलगामी ... मांडून त्या तत्वांना कालबाह्य होवू दिले नाही. १२ व्या शतकाचे ओझे वागवत असताना न्याय आणि ... या दोन तत्वांना विसरुन चालत नाही. धार्मिक हक्क, सत्ता, संपत्ती, दर्जा व माणूस म्हणून प्रतिष्ठा ज्या ...जघटकांना नाकारली जाते व ज्यांना देव-धर्म, मोक्ष-स्वर्ग-नरक, पाप-पूण्य इत्यादीच्या बळावर दडपले जाते ...लामीत वागलेले वर्ण समतेच्या आक्रोश करीत. संघर्ष उभे करतात व प्रचलित व्यवस्था ढवळून काढतात. ...सवेश्वरांनी १२ व्या शतकातील व्यवस्थेची विस्कटलेली घडीच्या पुनर्स्थापनेसाठी न्यायाच्या बाजूने संघर्ष उभा ...ला आणि परिणामी समतावादी नव्या व्यवस्थाचा जन्म झाला. समाज परिवर्तनाच्या समता व न्याय या दोन ...धार्मिक व्यवस्था आहेत. व्यवस्था परिवर्तन हे जर जीवनाची अविभाज्य अंगे असतील तर समता हे सामाजिक, ...राजकीय व आर्थिक ध्येयाचे गृहीत म्हणून अंतर्धान पावणार नाही. म्हणून बसवेश्वरांनी १२ व्या शतकात केलेल्या समतेच्या विचाराची दखल घ्यावी लागेल. ही दखल घेताना आजच्या नव्या युगातील नव्या संदर्भाच्या अनुषंगाने त्याची पुनःपुन्हा मांडणी करावीच लागेल.

**प्रेरणा :**

महात्मा बसवेश्वरांच्या समताविषयक विचारांची जडणघडण कशी झाली हे पाहताना त्यांच्यावर कोणकोणत्या विचारांचा, घटकांचा, व्यक्तींचा संस्कार झाला हे संयुक्तिकपणे पहावे लागते. वैचारिक प्रेरणांचा आढावा न घेता. बसवेश्वरांच्या समताविषयक संकल्पनेचे केलेले पुनर्मुल्यांकन गोडवे गाणारे असल्याचे जाणवते. तत्कालीन वैदीक, शैव सस्कृती, पुरोहितीव्यवस्था, अस्पृश्यता, दैववाद इत्यादी पारंपारिक विचारपरंपराशी चिकित्सक आणि सृजनशील संवाद करीत करीत बसवेश्वरांच्या समताविषयक धारणा उत्तरोत्तर प्रगल्भपणे विकसित होतात. बसवेश्वरांची समतेची संकल्पना निखळ वैचारिक प्रभावातूनच संस्कारित झालेली नसून तीस समाजस्पर्श आहे. व्यवहारवाद व वर्तनवादी संकल्पनांचा स्पर्श आहे. त्यामुळे बसवेश्वरांच्या समताविषयक संकल्पनामागे विवेकवादाची तर्कबुध्दी, न्यायबुध्दी, शोषणविरोधी व समतावादी दृष्टी, एकदेवोपासना, व्यक्ती-व्यक्तीतील समता, व्यक्तिची माणूस म्हणून असलेली प्रतिष्ठा इ. प्रेरणा स्पष्टपणे दिसतात या सर्व विचारांनी ... बसवेश्वरांनी आपली समतेची संकल्पना मांडली.

बसवेश्वरांच्या मते समता म्हणजे माणूस म्हणून अभिव्यक्त होण्यापासून ते माणूस म्हणून पूर्ण विकास करण्यापर्यंतची संधी सर्व मानवमात्रास मिळावी विकाससंबंधीचे सर्व प्रयत्न करण्याची सर्वांना समान संधी प्राप्त होणे. बसवेश्वरांची ही समतेची संकल्पना उदारमतवाद्याच्या विचाराशी जवळीकता साधते. पण आधुनिक काळात उदारमतवादी लोकशाही क्रांती झालेल्या देशांमध्ये अशी समता येऊ शकत नाही. जशी १२ व्या शतकात कल्याणमध्ये बसवेश्वरांनी मूल्यांतराच्या प्रक्रियेतून निर्माण केली. बसवेश्वरांच्या कल्याणनगरीत अनुभवमंटप, इष्टलिंग, कायकामूळे सत्ताधारी अभिजन आणि सामान्य नागरीक यांच्यातील सत्तेच्या सहभागीत्वा संदर्भातील विषमता संपुष्टात आली. १२ व्या शतकात उदारमतवादी आणि साम्यवादी विचाराच्या साह्याने बसवेश्वरांनी समतेच्या दिशेने एकेक पाऊल पुढे टाकले. पण समतेचा परिपूर्ण अविष्कार झाला नाही. कारण त्यात मानवी ह्दयातील विचारांना स्थान नव्हते. मानवी ह्दयांना जोडण्याचे काम चोखपणे पार पाडले नव्हते. जे काम बसवेश्वरांनी १२ व्या शतकात केले आणि हे करताना बसवेश्वरांना आधुनिक युगातील फुले-शाहू-अंबेडकर या विचार परंपरा, महात्मा गांधी आणि भारतीय राज्यघटनेतील समतेच्या विचारास आवश्यक आशय १२ व्या शतकात दिला. बसवेश्वरांनी परंपरावादी व्यवस्थेत परिपूर्ण, प्रगल्भ, विवेकी समतेची मांडणी केली. ज्यातून त्यांच्या समता संकल्पनेचे मानवतावादी चित्र स्पष्ट होते.

माणसाची माणूस म्हणून ओळख नाकारणे समतेच्या विरोधात आहे. तसेच व्यक्तिला विकासाची संधी नाकारणे परंपरावादाशी नाळ जोडणारा विचार आहे. माणसाची माणूस म्हणून होणारी ओळख त्याच्या आत्मसन्मान व आत्मभानाशी निगडीत असते. बसवेश्वरांनी माणूस म्हणून पूर्ण विकास साधण्यामध्ये माणसाच्या आध्यात्मिक, वैचारीक, भौतिक, आर्थिक विकासाच्या सर्व प्रश्न व प्रयत्नांना समता या मानवी मूल्याची जोड दिली. समाजातील कोणत्याही घटकातील व्यक्तिचे आत्मभान व आत्मप्रतिष्ठा नाकारुन केलेले समतेचे प्रयत्न समताधिष्ठित समाजस्थापनेच्या संदर्भात असफल ठरतात किंवा समाजात एकमेकाविषयी द्वेषाची भावना निर्माण करतात. बसवेश्वरांच्या समता लढ्यात वंचीत व शोषितांनाही जगता येण्याएवढी ताकत होती. बसवण्णा व्यक्तीची प्रतिष्ठा आणि मनुष्यत्वाचा गौरव कायम राखुनच सर्वांना समतेच्या दिशेने आणि स्वतःही त्याच दिशेने मार्गक्रमित झाले. म्हणून त्यांचा समतेचा प्रकल्प अधुरा राहिला नाही.

बसवेश्वरांनी समतेचा स्वीकार एक सामाजिक मूल्य म्हणून केला. समतेची प्राप्ती राज्यकारभार किंवा शासनव्यवस्थेची रणनीती असू शकते. याची जाण बसवेश्वरांना होती. म्हणून महामंत्री पदावर कार्यरत असताना त्यांनी तसा प्रयत्न केला. बसवेश्वरांनी समतेला मानवी जीवनातील श्रध्दा व सार्वत्रीक अनुभावात मानले. समता हा सार्वत्रीक अनुभाव होण्यासाठी मानवी समाज आणि व्यवस्थेचा घटक असणाऱ्या प्रत्येकाचा ती अविभाज्य

GLOBAL DREAMS
Half yearly Research Journal Vol I Issue VII, Aug 2015 to Jan 2016 ISSN 2279-0632

भाग बनावी.

समतेवर आधारीत समाजसंघटन (अनुभवमंटप) दासोहाच्या साह्याने निर्माण करुन माणसा माणसाकडे सम दृष्टीने पाहणाऱ्या साम्यवृत्तीच्या शरणांची व जंगमाची निर्मिती करुनच बसवेश्वरांनी समतेचा प्रकल्प सिद्ध केला. बसवेश्वरांनी व्यवस्था समताधिष्ठित करण्यापूर्वी मानवी मन व समाजाची मानसिकता समतावादी करण्यास आवश्यक असणारे संस्कार अनुभवमंटप, इष्टलिंग, पंचाचार व अष्टावरणाच्या माध्यमातून केले. यामुळे सामाजिक व मानसीक या दोन्ही पातळीवर एकाचवेळी समतेचा विचार राबवता आला. बसवेश्वरांपूर्वी जैन, गौतमबुध्द, लोकायत यांनी भारतीय समाजावर समतेच्या तत्वाचे संस्कार केले. तरीही भारतीय समाजव्यवस्थेत संधी मिळताच समतेच्या तत्वास डावलून माणसाने वर्णीय, जातीय, लिंगभावात्मक विषमतेचा पुरस्कार केला. बसवेश्वरांनी या इतिहासात घडलेल्या घटनांचा बोध घेवून समतेच्या तत्वाची अमलबजावणी अधिक शाश्वततेने व निष्ठेने कशी करता येईल या विषयीचे चिंतन वचनातून व्यक्त केले. समतेच्या तत्वावर समाजाची पुर्नरचना करण्यासाठी समतेच्या तत्वाचे बौध्दिक व तात्वीक संस्कार करणाऱ्याने सामाजिक व राजकीय हस्तक्षेप करण्याची आवश्यकता आहे असे बसवेश्वरांना वाटते. पण हे करताना माणूस म्हणून प्रत्येकांची प्रतिष्ठा जपली जावी. तसेच सामाजिक समता राखताना राजकीय विषमता निर्माण होणार नाही याची ही काळजी समतेचा उपदेश करणाऱ्यांनी किंवा राजकीय क्षेत्रात हस्तक्षेप करणाऱ्यांनी घ्यावी. समतानिष्ठ माणूस घडविण्याची प्रक्रिया कशी असावी हे स्वतःच्या आचारणातून जगाला दाखवून दिले. या प्रक्रियेतून निर्माण झालेल्या बसवेश्वरांचा समतानिष्ठ माणूस म्हणजे शरण व जंगम होय. ज्याची संख्या ७७० होती. ज्यात ७० महिला होत्या.

## महात्मा बसवेश्वर : सामाजिक अभिसरण व समता

महात्मा बसवेश्वरांनी समतेचा विचार मांडला तो प्रामुख्याने वैदीक समाज वास्तवाच्या संदर्भात आणि त्यातुन मानवाची मुक्तता करण्याच्या संदर्भात तो विचार आजच्या आर्थिक साम्राज्यवाद, बहुराष्ट्रीय कंपनीवाद आणि जागतिकीकरणातील विषमतेच्या युगातही माणसाची प्रतिष्ठा राखण्यात उपयुक्त आहे. वैदीक समाजात चातुर्वर्ण व्यवस्था, जातीयता, धर्माधिष्ठित पुरुषप्रधान संस्कृती व पुरुषप्रधान कुटूंब व्यवस्था, अर्थव्यवस्था होती. वैदीक धर्माधिष्ठिततेमुळे समाजात एक साचलेपणा व गतिशून्यता आली होती. या गतिशून्य व विषमताधिष्ठित समाजात समतेच्या विचारांचे बीजारोपण करुन त्याचे वटवृक्षात रुपांतरण करण्यासाठी सामाजिक अभिसरणाची आवश्यकता होती. त्यामुळेच बसवेश्वरांनी १२ व्या शतकात समतेसाठी सामाजिक अभिसरणाच्या प्रक्रियेवर भर दिला. त्यासाठी त्यांनी गावकुसाबाहेर राहणाऱ्या लोकांसोबत त्यांच्या वस्त्यात जावुन त्यांच्याशी एकत्रीत बसुन विचार विनिमय करणे, त्यांच्यासोबत सहभोजन करणे, समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेतील त्यांच्या योगदानाची त्यांना जाणीव करुन देणे, सर्वांनी श्रम करुनच जगावे, धार्मिक स्वातंत्र्याच्या हक्काचा आनंद इष्टलिंगाच्या पुजनाने घ्यावा, देव व धर्माच्या नादाला लागून स्वतःचे शोषण न करुन घेता मानवातच देवत्व पहावे, देहालयालाच

GLOBAL DREAMS ISSN 2279-0632
Half yearly Research Journal Vol I Issue VII, Aug 2015 to Jan 2016

देवालय बनवावे, गावागावात अभिव्यक्ति स्वातंत्र्याच्या जोपासण्यासाठी व शैक्षणिक स्वातंत्र्याच्यापुर्तीसाठी अनुभवमंटप चालवावे इत्यादी माध्यमातून बहुजन समाजात जागृती केली स्त्रिया, अस्पृश्य व बहुजनांच्या सामाजिक, धार्मिक, राजकीय व आर्थिक हक्क आणि संधीची भाषा बिज्जल दरबारात कारकूण, अर्थमंत्री व महामंत्रीपदावर विराजमान असताना केली. तसेच वर्णाधिष्ठित समाजव्यवस्थेत स्वतःच्या कल्याण व हिताची भाषा करुन अधिकार व सोयीचे केंद्रीकरण करणाऱ्या उच्चवर्णिय अभिजनांची दुटप्पीवृत्ती समाजासमोर मांडली. तसेच अनेक उच्चवर्णीयांना आपल्या आचार-विचारत परिवर्तन करण्यास प्रेरीत केले. सर्वांनीच स्वइच्छेने कष्ट करावे. ऐतखाऊ जीवनवृत्ती पुरोहीत व ब्राह्मणवर्गाने नाकारावी. मानवाची विभागणी ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र या चार वर्णात न करता मानवातील देवत्व मानणाऱ्यांचा एक वर्ग व न माणनाऱ्यांचा एक वर्ग अशी केली.

तसेच मानव हीच एक जात मानली. शुद्रातिशुद्रांनी आपला स्वाभिमान जागृत करुन सार्वजनिक जीवनात आपल्या हक्कासाठी अनुभवमंटपात यावे अंतरंग व बहिरंग शुध्दतेचा स्विकार करावा. परधन व परस्त्रिस नरकासमान मानावे. ह्दयपरिवर्तनाच्या प्रक्रियेतून उच्चवर्णियांच्या मनात शुद्रांविषयी प्रेमभाव निर्माण करावा. हक्कपुर्तीचा भाग अहिंसात्मक पध्दतीने मिळवावा. स्त्रियांनीही आपल्या हक्कांसाठी सार्वजनिक जीवनात आपला सहभाग नोंदवावा. पुरुषांच्या बरोबरीने सार्वजनिक जीवन जगावे. आपले परंपरावादी कार्यक्षेत्र झुगारुन देवून समाज बांधणीतील आपले योगदान पक्के करावे. स्त्री-पुरुष समतेचा भाव सर्वांनी जीवनात अंगीकारावा. कुटुंब व समाजव्यवस्थेत स्त्रियांच्याही विचाराला प्राधान्य द्यावे. स्त्री ही माया नाही, पापी नाही ती सहचारिणी आहे. अभिजनांनी चंगळवादी जीवन त्यागुन समाज बांधवांच्या कल्याणासाठी बहुजन समाजात मिळून-मिसळून वागावे. मानवाने एकमेकांच्या सुखःदुःखात सहभागी व्हावे. बहुजन ही या व्यवस्थेचा एक घटक आहे. त्यामुळे त्यालाही व्यवस्थेप्रती आपला विचार मांडण्याचे व व्यवस्थेसंबंधीच्या निर्णप्रक्रियेत सहभागी होण्याची संधी देवून प्रजाप्रभुत्वाचा विचार मांडून तो रुजविला. समाजातील श्रीमंत वर्गाने दासोह तत्वाचा अंगीकार करावा . गरीब व श्रीमंत दरी कमी करावी. धनाचा योग्यपणे वापर करावा. विषमताग्रस्त समाजात आंतरक्रिया व अभिसरण सुरु झाल्याविना समाजातील घटकांत आत्मभान येणार नाही. आत्मभानाचा विचार मानवात हक्क व कर्तव्याच्यापुर्तीच्या संघर्ष उभा करतो. हक्क व कर्तव्य प्राप्ती व पुर्तीचा संघर्ष उभा झाल्याशिवाय समतेचा लढा उभा करता येणार नाही. जाती व वर्णाधिष्ठीत समाजात अभिसरणाच्या प्रक्रियेस वाव नसतो. सरंजामदारी, राजेशाहीची व्यवस्था सामाजिक अभिसरणाबाबत उदासीन असते. अशा विरोधांच्या अवस्थेत बसवेश्वरांनी अभिजनांची कर्तव्यबुध्दी, सामाजिक बांधीलकी व जबाबदारी जागृत करुन व बहुजनांमध्ये आत्मभान जागे करत, जाती व वर्णविरहित समाज, गुण व कर्मावर आधारित समाज, मुल्याधिष्ठित समाजजीवन, एकदेवोपासना, श्रमाधिष्ठित समाज, विवेकवादी जीवन इत्यादी रचनात्मक कार्यक्रमातून सामाजिक अभिसरणास सुरवात केली. बसवेश्वरांच्या सामाजिक अभिसरणामुळे समकालीन समाज ढवळून निघाला. त्याचे साचलेपण संपले. अंतर्विरोधाचे घटक

...झाले. भारतातील समतेचा प्रश्न प्रामुख्याने चतुर्वर्णव्यवस्था, अस्पृश्यता, जातीयता, सरंजामदारी, राजेशाही, गुलामगीरी, बहुदेवोपासना, स्वर्ग-नरक संकल्पना, पाप-पुण्य, देववाद, आळस, अज्ञान हक्काचे केंद्रीकरण इत्यादींशी निगडीत आहे. जोपर्यंत समाजातून वरील अनिष्ट असामाजिक तत्वांचा नायनाट होत नाही. तोपर्यंत जाती-वर्णविरहित गुण व कर्मावर आधारीत शोषण निर्मूलन व समताधिष्ठित समाज निर्माण होत नाही. हा समतावादी लढा बसवेश्वरांनी कोणतीही पुरोगामी पार्श्वभूमी कौटूंबिक व भोवतालच्या परिस्थितीत नसताना केला. सामाजिक समता व अभिसरणाच्या दिशेने जेंव्हा जेंव्हा चिंतन व मनन होईल तेव्हा बसवेश्वरांच्या अभिसरणात्मक समतेच्या लढ्याचा उल्लेख आवर्जुन केला जाईल. कारण बसवेश्वरांच्या समताविषयक विचाराने समताविषयक चर्चाविश्वात मोलाची भर घातली आहे. तसेच पुढील समताविषयक आंदोलनास समर्पक मार्गदर्शक ठरणारा विचार मांडले.

**महात्मा बसवेश्वर आणि आर्थिक समता :**

महात्मा बसेवश्वरानी भारतीय समाजातील आर्थिक विषमतेस जवळून पाहिले होते. तत्काळात भारतीय समाजात श्रीमंत-गरीब अशी दरी होती. दारिद्र्य, गरिबी, बेकारी इत्यादी प्रश्न होते. लोकांची दैववादी प्रवृत्ती, लोकांना कर्तव्यशून्य बनवत होती समाजात अज्ञान होते. देव व धर्माच्या नावावर समाजाचे शोषण पुरोहित व ब्राह्मणामार्फत होत असत. वर्णाधिष्ठित समाजव्यवस्थेने व्यावसायिकतेचे निर्बंध लादले. उत्पादनाच्या प्रक्रियेचा वेग मंदावलेला होता. कारण समाजातील लोक ऐतखाऊ व आळशी होते. कष्ट न करता सुखवासी जीवन जगण्यास मिळावे. अशी प्रत्येक मानवाची धारणा होती. वर्ण व जातीव्यवस्थेने कांही जातीतील माणसांना जन्मतःच कष्टाचे धनी बनवले होते. तर उच्चवर्णीय जातींना ऐतखाऊ बनवून त्यांच्यात शारिरीक कष्ट करणाऱ्यांविषयी घृणा निर्माण केली, तसेच उत्पादन निर्मितीत त्यांची शक्ती उपयोगात येत नव्हती. शिक्षण व्यवस्थाही याच विषमतायुक्त उत्पादनशक्तीचे समर्थन करणारी होती. बसवेश्वरांनी १२ व्या शतकातील विषमतेची चिकित्सा करताना आर्थिक विषमतेच्या प्रश्नांवर अधिक चिंतन केले. त्यांच्या या चिंतनातून आर्थिक विषमता निर्मूलना विषयीचे काही मूलगामी उपाय दिसून येतात. त्या उपायातून बसवेश्वरांच्या आर्थिक समतेत कायक व कैलास, दासोह, सदाचार वे स्वर्ग - अनाचार वे नरक, अर्थार्जनाचे मार्ग व विनियोगाची पध्दत, करव्यवस्था, खाजगी संपत्तीस विरोध, शिक्षण, दारिद्र्याची उपाययोजना, धर्म व अर्थनितीचा संबंध हे प्रमुख घटक आहेत. कायक वे कैलास हा घटक चंगळवादी व ऐतखाऊ वृत्तीला नष्ट करुन श्रम हाच परमेश्वर आहे. हा विचार रुजवून उत्पादन वाढीच्या प्रक्रियेत सर्वांचा समान वाटा सिध्द करणारा आहे. स्वावलंबी मानव व समाजाची निर्मिती करणारा आहे. सर्वांमध्ये युगाची समता निर्माण करणारा आहे. दासोह यास गांधींच्या भाषेत विश्वस्ताची संकल्पना किंवा अपरिग्रहाचा सिध्दांत म्हणतात. दासोहाच्या माध्यमातून साधी रहाणी व उच्च विचारसरणीचा विचार सर्व मानवात रुजवला. समाजातील श्रीमंत वर्गानी स्वतःच्या गरजांचे नियंत्रण करुन आपल्या संपत्तीचा वापर इतर मानवांच्या गरजा भागविण्यासाठी करावा. अतिरिक्त धनसंचय किंवा खाजगी मालमत्तेच्या संग्रहाविरोधी

GLOBAL DREAMS ISSN 2279-0632
Half yearly Research Journal Vol I Issue VII, Aug 2015 to Jan 2016

दासोह एक भाष्य आहे. खाजगी मालमत्तेच्या विरुध्द बसवेश्वरांनी दिलेल्या संदेशाचा प्रबोधनात्मक आदेश आहे.

महात्मा बसवेश्वरांचा दासोह सिध्दांत तत्कालीन व आजच्याही शोषणास विरोध करुन आर्थिक समतेचा
आशय स्पष्ट करणारा आहे. बसवेश्वरांच्या दासोह तत्वज्ञानास दान या अर्थाने संबोधून त्याची नकारात्मक उपेक्षा
करण्याचा प्रयत्न कांही अभ्यासकांनी केला. पण बसवेश्वरांनी दासोहाची अंमलबजावणी व्यक्तिगत जीवनात
करताना आपल्या मिळकतीतील जीवनावश्यक भाग आपणाकडे ठेवून इतर सर्व भाग समाजकल्याणासाठी वापरला.
पण यात उपकाराची भावना न बाळगता कर्तव्य किंवा सामाजिक बांधीलकीचा विचार जोपासला. समाज कल्याणाची
व धनविंयोगाची ही अहिंसक रीत त्याकाळात दासोहातून सांगितली. जीचा वापर आजच्या धनदांडग्यांनी करावा.
स्विस बँकेतील धन समाज कल्याणाच्या उपयोगी आणल्यास समाजातील असंख्य प्रश्न सुटतील. ही दासोहाची
२१ व्या शतकातील प्रस्तुतता आहे. बसवेश्वरांनी या दासोह तत्वाच्या वृत्तीचा फैलाव कसा होईल याचा प्रयत्न
केला. खाजगी मालमत्तेच्या संकल्पनेला विरोध करताना बसवेश्वर म्हणतात की, खाजगी मालमत्ता सामाजिक
हिंसा, अनैतिकता, कलह, द्वेष निर्माण करते. त्यामुळे आर्थिक विषमतेची दरी वाढते. माणसे संपत्तीचा मुंगळा
ढसल्याप्रमाणे मदमस्त होवून नाचायला लागतात. व्यवस्था ही अराजकतेची बनते. म्हणून समाजातील खाजगी
मालमत्तेचे संचय करणाऱ्या आहे रे वर्गाने तिचा विनियोग दासोहाच्या साह्याने नाही रे वर्गाच्या कल्याणासाठी
करावा. ज्यामुळे समाजात शांतता, सुख, ऐश्वर्य, बांधीलकी व अहिंसेचे वातावरण निर्माण होईल. तत्कालीन
धनदांडग्यांना खाजगी संपत्तीचा वापर समाजकल्याणासाठी करण्यास प्रेरीत केले. उदा. काश्मिरचा राजा महादेव,
मधुवरस, बलदेव इ. पण बसवेश्वरांनी समाजातील नाही रे वर्गांना आहे रे वर्गाची संपत्ती हिसकावण्याचा
मार्क्सप्रणीत हिंसक संदेश दिला नाही. तसेच आजच्या राज्यासारखी हिंसक भूमिका राज्याने घ्यावी असेही विचार
मांडले नाहीत. थोडक्यात दासोह व खाजगी मालमत्ताविरोधी विचार आर्थिक पुर्नरचनेचा मुख्य कार्यक्रम आहेत.
तसेच दासोहातून संपत्ती व संपत्तीच्या किंवा उत्पादनाच्या साधनाचे न्याय वितरण व ते जनहितार्थ राबवण्याचा
होता.

बसवेश्वरांनी समताधिष्ठित समाज निर्मितीसाठी मानवी मूल्यावर आधारित अहिंसात्मक विचारप्रणाली
व रचनात्मक कार्यक्रमावर भर दिला. समाज शोषण मुक्त झाल्याशिवाय खऱ्या अर्थाने समताधिष्ठित व अहिंसात्मक
होत नाही. आर्थिक समता व अहिंसेचा परस्परसंबंध आहे. आर्थिक समतेचा प्रयत्न करताना श्रम व ऐतखाऊ
वृत्तीमधील पारंपारिक संघर्ष नष्ट करणे होय. श्रीमंत लोकांना सर्वांच्या बरोबरीने आणणे. तसेच गरीब, वंचित
यांना विकासासाठी पोषक वातावरण व संधी उपलब्ध करुन देणे. ज्यातून बहूजनांच्या राहणीमानाचा दर्जा
उंचावेल. श्रीमंतानी आपल्या कडील पैसा आणि राजकीय अभिजनांनी आपल्या सत्तेचा स्वइच्छेने त्याग करुन
सत्ता व संपत्तीचा वापर सर्वांच्या कल्याणासाठी करावा. असे समाजातील श्रीमंत व सत्ताधीश लोक करत नव्हते
म्हणूनच तत्कालीन समाजात अत्याचार, अन्याय, शोषण, अशांततेचे प्रमाण वाढले होते. आज ही तीच अवस्था

Half yearly Research Journal, Vol I Issue VII, Aug 2015 to Jan 2016 ISSN 2279-0632

जगातील प्रत्येक राष्ट्रात आहे. त्यामुळे भारताचे माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग म्हणतात, श्रीमंत-गरीब ही दरी भारतात दिवसेंदिवस वाढत आहे.

बसवेश्वरांच्या मते समता म्हणजे प्रत्येकाला आपल्या गरजा भागविण्यासाठी पुरेशी साधने सहजी उपलब्ध होणे. समाजातील धर्ममार्तंड व राज्यकर्त्या वर्गाकडून इतर लोकांचे होणारे शोषण व बहुजनांत अज्ञान व दैववादी वृत्ती शोषण व दारिद्र्यास कारणीभूत आहे. शोषणाची वृत्ती थांबविल्याशिवाय समतेचा विचार रुजत नसतो. बहुजनांचे शोषण समाजातील पुरोहित, ब्राह्मण, सरंजामदार, अग्रहार प्रमुख व राजामार्फत होत असत. बहुजन समाजाचे कार्य वस्तुचे उत्पादन करणे पण बहुजनामार्फत झालेल्या उत्पादनाचा उपभोग मात्र समाजातील अभिजन वर्ग घेत असत. देव व धर्माचा आधार घेऊन मोक्ष प्राप्ती, स्वर्गसुख, कैलास, पाप-पुण्य इ. दैवी संकल्पनांच्या माध्यमातून बहुजनांचे आर्थिक, बौध्दीक व मानसीक सुख पुरोहितामार्फत होत असत. होम-हवन व यज्ञ पध्दतीतुन दुसऱ्याच्या घरावर तुळशीपत्र ठेवून स्वतःचे घर भरण्याचा उद्योग तत्कालीन पुरोहितांचा होता. पण त्याच होम-हवनातील अग्नीने त्यांच्या घरास पेटले तर ते विझवण्यासाठी आचमनाचे पाणी किंवा कापूर टाका म्हणतात. अशी दुप्पटी भुमिका स्वीकारल्याचे सांगुन बसवेश्वरांनी पुरोहितशाहीचे पितळ उघडे केले. पुरोहितामार्फत होणाऱ्या शोषणास बहुजन समाजाव्यतिरिक्त राजाही बळी पडत असत. राजाकडून आपणास धन-धान्य व प्रशस्तीपत्र मिळून राजाश्रय मिळावा यासाठी राजाने ब्राह्मणांना दान द्यावे, यज्ञ करावा यामुळे राजावर कोणतेही संकट येणार नाही. तुझी किर्ती चारही दिशांना पसरत जाईल. असा दैववादी विचार रुजवत असत. बसवेश्वरांनी आर्थिक समता मांडताना शोषणाचा नायनाट महत्वाचा मानला. प्रत्येकाने कायक करुन वस्तूंचे उत्पादन करावे. धनप्राप्ती करावी. यामुळे आपल्या जीवनावश्यक गरजा भागविण्याची क्षमता आपल्यात निर्माण होते. भीक मागण्याची वृत्ती नाहिसी होते. मूलभूत गरजांचा तुटवडा होणार नाही. बसवेश्वरांचा आर्थिक समतेचा विचार शोषणमुक्ती सोबत माणसाच्या परिपुर्ण विकासाचा विचार करतो.

तत्कालीन समाज व राज्य व्यवस्थेने आर्थिक समृध्दीच्या दृष्टिकोनातून मांडलेल्या किंवा केलेल्या उपायांची चिकित्सा करुन, बसवेश्वर म्हणतात की, राज्याचे कार्य कर वसूली करण्यासोबतच समाज व राज्यातील जनतेला कर भरण्याइतपत प्रथम सक्षम करावे. जनतेत सदाचारी, श्रमाविषयी आपुलकी किंवा श्रमाच्या महात्म्याचे महत्व पटवून सांगावे. यामुळे कर वसुली करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उत्पादनापेक्षा अधिक खर्च करण्याची गरज नाही. कारण कायकी व समाजनिष्ठ आणि राज्यनिष्ठ सदाचारी जनता उत्पादनाचे प्रमाण वाढल्यास स्वतःच कर आणुन तिजोरीत जमा करेल.

शिक्षणाच्या बंदीस्तीकरणास विरोध करुन अनुभवमंटपातून शिक्षणाचे सामाजिकरण किंवा सार्वत्रीकरण केले. शिक्षणामुळे मानवा-मानवात प्रेमाची, मानवतेची भावना निर्माण होते. शिक्षणाच्या प्रसाराने दासोहाचे आर्थिक समतावादी तत्वज्ञान रुजवणे सोपे जाते.

GLOBAL DREAMS
ISSN 2279-0632
Half yearly Research Journal Vol I Issue VII, Aug 2015 to Jan 2016

आर्थिक समतेसाठी पैशांची निर्मिती किंवा वस्तूचे उत्पादन हे गरजेनुसारच व्हावे. वस्तुच्या उत्पादनात गरजेशिवाय नफा हे सुत्र असेल तर शोषण वाढते. शोषण थांबविल्याशिवाय समता अवतरित होत नाही. आर्थिक क्षेत्रातील बहुजनांचे शोषण तत्कालीन समाजातील दोन वर्गाकडून होते. एक सामाजिक व धार्मिक पातळीवरील भट, भिक्षुक किंवा पुरोहित ज्याचा आधार देव, धर्म, स्वर्ग-नरक, पाप-पुण्य इत्यादी संकल्पना असतात. तसेच दुसरा वर्ग राजेशाही व्यवस्थेच्या बुंध्यांशी चिकटलेला असतो, ज्यास महाजन, अग्रहार प्रमुख, सरंजामदार, प्रांतपाल व राजा इत्यादीचा समावेश असतो. बसवेश्वरांनी आपल्या वचनात देव व धर्माच्या साह्याने बहुजनांचे हाणाऱ्या आर्थिक शोषणावर डोळसपणे टिप्पणी केली. तसेच राजेशाही व तिच्याशी नाळ जुळवून राहणाऱ्यांना संपत्तीच्या अपेक्षेचा ऐश झाल्यास ते कसे वागतात याचे वर्णन केले. बसवणांची आर्थिक समता फक्त आर्थिक प्राप्तीतील समानता नसुन, माणसाच्या शोषणमुक्तीच्या व परिपूर्ण विकासाचा विचार आहे आर्थिक व्यवस्था राबवणाऱ्या तत्कालीन राज्यकर्त्या व समाजकर्त्यांना बसवेश्वरांनी काही मूलभूत प्रश्न विचारले असावेत. त्यात मानवाने धन का कमवावे ? किती कमवावे ? अर्थ व धर्म यांना मानवतावादी चेहरा असावा का ? राक्षसी ? इत्यादी या सर्व प्रश्नांना समजून घेवून वर्तन करणारी व्यवस्था या काळात नव्हती. म्हणून बसवेश्वरांच्या आर्थिक समतेस प्राधान्य देणाऱ्या ब्राह्मण्यवाद, पुरोहितशाही विरोधी विचार व खाजगी संपत्तीस विरोध करणाऱ्या विचारास समजून घ्यावे लागेल. पण याचा अर्थ असा नाही की बसवेश्वर ब्राह्मण व पुरोहित विरोधी होते. त्यांचा विरोध मानव किंवा व्यक्ती जात किंवा वर्गास नसून मानवातील वर्णनिहाय काटेकोरपणे वर्तन करणाऱ्या प्रवृत्तीस होता.

मानवी श्रमाचा वापर लोकहितार्थ व्हावा. माणसाला आळशी, कौशल्यहीन, श्रमविन्मुख आणि बेरोजगार बनवणाऱ्या व्यवस्थेचा विरोध केला. कारण त्यामुळे उत्पादन प्रक्रियेचा वेग वाढत नाही. चैनी व विलासी व्यवस्थेवर आधारीत व्यवस्थेत सर्वांनाच रोजगार करण्यासाठी बंधन केले जात नाही. अशी व्यवस्था समाजातील अल्पसंख्य वर्ग निर्माण करतो. समाजातील असंख्यांना परंपरागत व्यवसायात गुंतवून ठेवणारी आणि सर्वांच्याच परिश्रमातून साकारणारी हस्तोद्योग, ग्रामोद्योगासारखी व शेतीवर आधारीत उत्पादन व्यवस्था श्रेयस्कर मानली. बसवेश्वरांचा उत्पादनाविषयीचा हा विवेक, बेरोजगारी शोषण व आर्थिक विषमता आणि श्रमाविषयीच्या धार्मिक प्रभुत्वास विरोध करणारा आहे.

महात्मा बसवेश्वरांची आर्थिक समता तत्कालीन सरंजामदारी व्यवस्था व जीवनांचे उच्चाटन करणारी आहे. यात त्यांनी परंपरावादी मानवी संबंधाची नवीन निकषाच्या साह्याने फेररचना केली. त्यासाठी शेतीपुरक योजना बनवल्या, शेती व्यवसायास आवश्यक कर्ज दिले, शिक्षण करुन त्या सर्वच मानवांना पुरवण्याची ताकत आहे. पण त्यासाठी सर्वांनीच कायक करणे क्रमप्राप्त आहे. पण तत्कालीन अभिजनांनी स्वतः श्रम न करता बौध्दिक दुटप्पीपणाच्या जोरावर बहुजन समाजाला लुबाडले. स्वतःच्या ऐश्वर्याचा इमला बनवला. पण त्यासाठी

ISSN 2279-0632
Half yearly Research Journal Vol I Issue VII, Aug 2015 to Jan 2016


...नाच्या श्रमरुपी रक्ताचा चुना म्हणून वापर केला. तत्कालीन सरंजामदारी व राजेशाहीच्या व्यवस्थेतील ...च्या धमण्यात जे रक्त वाहते आहे . ते बहूजनांच्याच श्रमाची देणगी आहे. पण समाजातील सर्वांनीच श्रम ... तर संपन्नतेचे रक्त बहुजनांच्याही धमण्यातून वाहू लागेल.

बसवेश्वरांचे वरील आर्थिक समते विषयीचे विचार पाहता त्यांनी तत्कालीन व आजच्याही भारतीय ...जातील धार्मिक शोषण, पुरोहितशाही, सरंजामदारी व्यवस्था, गरीब आणि श्रीमंत, कष्टकरी आणि ऐतखाऊ, ...हितवादी. भांडवलदार, चंगळवादी कुपोषित यांच्यातील अंर्तविरोधाचे भान असल्याचे जाणवते. स्वत ...णारा आणि इतरांना जगण्यास बंधन टाकणारा विचार व लोक कारणीभुत होते असे बसवेश्वरांना वाटत होते. ...न बसवेश्वरांनी उच्चवर्णीयांच्या ऐतखाऊ, आळशी, विलासी व श्रमविन्मुख वृत्तिस विरोध करुन सर्वांनीच ... करुन उत्पादन वाढीला हातभार लावावा असा कायक वे कैलास हा सिध्दांत मांडला. पण हे मांडताना ...जातील प्रस्थापित वर्ग तत्काळात विवेकशून्य होऊन संघर्ष करणार नाही याचीही दक्षता घेतली. बसवेश्वरांची ...र्थिक समतेची संकल्पना वचन साहित्याच्या साह्याने व कृतिशीलततेतून समजून घ्यावी लागेल.

समाजातील शोषण विरोधी विचार टाळण्यासाठीच दासोहाची संकल्पना मांडली. बसवेश्वरांच्या मते ...सोहाचा मुख्य आधार आर्थिक समता, समाज सेवा, सर्वांनाच जगण्यास उपलब्ध संपत्ती करुन देणे, तसेच ...माजातील श्रीमंत-गरीब दरी दुर करणे, अभिजनांच्या चंगळवादास नाकारणे, समाजातील सर्वच वर्गाचे उदात्तीकरण ...रणे होय. तत्कालीन व आजच्या बहुसंख्य लोकांचे कल्याण साधण्याची ताकत कायक वे कैलास आणि दासोह ...सिध्दांत आहे.

बसवेश्वरांची आर्थिक समतेची कल्पना कायक, दासोह उत्पादनाशी निगडीत विचार पैशाचा विनियोग ...त्यादींच्या साह्याने समजून घ्यावी लागेल. शोषणमुक्त समाज निर्मितीचे महात्मा गांधी, कार्लमार्क्स व इतर आधुनिक समाजवादाचे स्वप्न बसवेश्वरांना मान्य होते. पण समाजवाद्याप्रमाणे समाजात वर्णांतीत संघर्ष निर्माण करुन आर्थिक समता प्रस्थापित होऊ शकते हे बसवेश्वरांना मान्य नाही. समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या प्राथमिक व मुलभूत गरजांची पुर्तता झाल्यावरच संपन्नतेचा ध्यास आपण घेवू शकतो. कारण अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य व रोजगार या प्राथमिक गरजांच्या पुर्ततेशिवाय मानवाचे खरे सबलीकरण होत नाही. आर्थिक विकासाच्या लाभाचे वाटप किंवा वितरण समता व न्याय पध्दतीने व्हावे. ज्यामुळे सर्वांच्या प्राथमिक गरजा पूर्ण होतील. प्रत्येक व्यक्तीला उत्पादक या नात्याने श्रम करणे बंधनकारक ठरेल. प्रत्येकाने श्रम करुन वस्तूच्या उत्पादनवाढीत सहभाग नोंदवल्याने शोषण व विषमता रहाणार नाही. समृध्दीनंतरही श्रमप्रतिष्ठेचा आग्रह बसवेश्वरांनी धरला. कारण बसवेश्वरांच्या संपूर्ण अर्थविषयक चिंतनात श्रमाला फार महत्व आहे. कारण श्रम हे नुसतेच उत्पादन मूल्य नाही. तर ते उपासना मूल्य किंवा जीवनाला सुखकारक करण्याचा मार्ग आहे. कायकास बसवेश्वरांनी उपासना मूल्य प्राप्त करुन दिल्यामुळेच कल्याणमध्ये श्रमिकांच्या संस्कृतीचा उदय झाला. आर्थिक समता आणण्याचा

GLOBAL DREAMS ISSN 2279-0632
Half yearly Research Journal Vol I Issue VII, Aug 2015 to Jan 2016

कायक वे कैलास हा एक महत्वाचा मार्ग बसवेश्वर सांगतात कारण जीवन जगण्यासाठी किंवा पोटासाठी लागणाऱ्या वस्तूंचे उत्पादन सर्वांनीच श्रमाच्या साह्याने केले तर समाजात दारिद्र्य व असंतोष निर्माण होणार नाही. गुलामगीरीची व्यवस्था नष्ट होईल. समाजात संतोष व आरोग्य नांदेल. तत्कालीन चतुर्वर्ण व्यवस्था व जातीयतेने एका विशिष्ट वर्गाला स्वइच्छेने परिश्रम करण्यापासून दूर ठेवले. तर कांही जणांना पोटासाठी श्रमाची सक्ती करुन त्यांना गुलामगिरीत ठेवले. बसवेश्वरांना हे अमान्य होते. म्हणून त्यांनी शरीरश्रम करणे प्रत्येक मानवाचे कर्तव्य मानले स्वकष्टाने मिळविलेल्या संपत्तीवरच आपली मालकी असावी इतर संपत्तीवर समाजाची मालकी असावी. तत्कालीन व आजचा श्रीमंत किंवा विलासी वर्ग श्रम न करता कमावलेल्या संपत्तीचा अनिर्बंध भोग घेत असत. तो श्रमाच प्रतिष्ठाही घालवतो. कारण दिवसभर कायक केल्याने भूक लागते. खाल्लेले पचते. शिवाय चैनी, विलास ऐतखाऊ जीवनातून येणारा लठ्ठपणा, बी.पी. शुगर इत्यादी त्रासदायक रोग होणार नाहीत. खाल्लेले पचावे म्ह व्यायाम करण्यापेक्षा सर्वांनीच शारिरीक श्रम करणे योग्य. कायकाचे तत्व सर्वांनीच अंगीकारले तर अमान असा श्रेष्ठ-कनिष्ठ भाव नष्ट होईल.

## संदर्भ सूची

१. समाजसुधारक महात्मा बसवेश्वर - डॉ.अशोक मेनकुदळे.
२. अनुभवमंटप - संपादक - किरण कोरे.
३. बसव सिध्दांत - संपादक - प्रा. म.इ.तंगावार व बाबुराव माशाळकर.
४. बसव तत्वचिंतन - संपादक - प्रा. म.इ.तंगावार व बाबुराव माशाळकर.
५. बसव पथ द्वैमासिक - संपादक - बाळासाहेब पाटील.
६. युगप्रवर्तक महात्मा बसवेश्वर - संपादक - प्रा.भिमराव पाटील व प्रा.करजकर.
७. वीरशैव व इतर धर्म आणि समाज - डॉ.सुर्यकांत घुगरे.